धारणा यामध्ये अडथळा येतो. त्यामुळे कच्ची फळे गळून पडतात. फळे वेड्यावाकड्या आकाराची होतात.

**मॉलिब्डेनम :** कमतरतेची लक्षणे तळाकडील जुन्या व त्यांच्यावरील लगतच्या पानांवर आढळतात. पाने पिवळी होऊन त्यावर तपकिरी ठिपके पडतात. कमतरता तीव्र स्वरूपात असल्यास पानांच्या कडा गुंडाळल्या जाऊन पाने वाळून जातात. झाडाला फुलोरा अतिशय कमी प्रमाणात येतो.

## माइक्रोला वापरण्याचे प्रमाण व पद्धत

१) सर्व पिकांसाठी, ५०० मि.लि. माइक्रोला २०० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकरी फवारणी करावी किंवा ठीबक सिंचनाद्वारे द्यावे.

२) फळझाडांसाठी प्रति झाड २५ मि.लि. माइक्रोला १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी किंवा मुळांशी आळवणी करावी.

## माइक्रोला फवारणीची वेळ

१) **सर्व पिकांसाठी :** पहिली फवारणी पेरणीनंतर २५ ते ३५ दिवसांच्या दरम्यान करावी. दुसरी फवारणी ६० ते ७० दिवसांच्या दरम्यान अथवा फुलांचा बहर येण्यापूर्वी करावी.

२) **ऊसासाठी :** पहिली फवारणी ६० दिवसांनी करावी. दुसरी फवारणी १२० दिवसांनी करावी.

३) **फळझाडांसाठी :** फुलांचा बहर येण्या अगोदर २ ते ३ फवारण्या पानाच्या दोन्ही बाजूंवर कराव्यात.

४) फवारणी करताना द्रावण पानांवरून ओघळून जाऊ देऊ नये, दंव पडतो त्याप्रमाणे फवारणी करावी. द्रावण पानांमधून शोषले जाणे महत्वाचे आहे.

५) फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळच्या वेळेस करावी.




**आरसीएफचे दर्जेदार सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त द्रवरुप खत**

# माइक्रोला

माइक्रोला हे सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त द्रवरुप खत आरसीएफच्या अधिकृत विक्रेत्यांकडे २५० मि.लि., ५०० मि.लि., १ लिटर, ५ लिटर व १० लिटरच्या पॅकिंगमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.

**सूक्ष्म अन्नघटकद्रव्यांचा वापर करा,**
**अधिक व चांगल्या प्रतिचे पीक उत्पादन मिळवा !**

**राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टिलायझर्स लि.**
(भारत सरकारचा उपक्रम)

**नोंदणीकृत कार्यालय**
प्रियदर्शिनी, आठवा मजला, इस्टर्न एक्सप्रेस हाईवे, सायन, मुंबई – ४०० ०२२

**आरसीएफ किसान केअर टोल फ्री क्रमांक : १८०० २२ ३०४४**
**वेब साइट : www.rcfltd.com**

शेती विषयक माहितीसाठी गुगल प्ले स्टोअर्स वरुन 'आरसीएफ किसानमंच मोबाईल ॲप' मोफत डाऊनलोड करा.

Follow : rcfkisanmanch on
facebook twitter instagram

# पिकाच्या जोमदार वाढीला, आरसीएफ चे दर्जेदार माइक्रोला

## सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त द्रवरुप खत




**सर्वोत्तम दर्जा, रास्त किंमत !**

**राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टिलायझर्स लि.**
(भारत सरकारचा उपक्रम)

# माइक्रोला

(सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त द्रवरुप खत)

**पिकांच्या वाढीसाठी व भरघोस उत्पादनासाठी पिकांना १६ अन्नद्रव्यांची नितांत गरज असते. यापैकी कार्बन, ऑक्सिजन व हायड्रोजन ही अन्नद्रव्ये पिके वातावरणातून घेत असतात. नत्र, स्फुरद व पालाश ही मुख्य अन्नद्रव्ये आरसीएफ च्या सुफला १५:१५:१५, निमकोटेड उज्ज्वला यूरिया, श्रीफला डिएपी, एसओपी, एमओपी व विद्राव्य खते सुजला १९:१९:१९ आणि सुजला १३:४०:१३ इत्यादी रासायनिक खतांमधून दिली जातात. पिकांना आवश्यक असणाऱ्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता पूर्ण करण्यासाठी आरसीएफ च्या कृषीसंशोधन विभागाने पिकांना आवश्यक असणाऱ्या सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त 'माइक्रोला' या द्रवरुप खताची निर्मिती केली आहे. यात जस्त, तांबे, लोह, बोरॉन, मॉलिब्डेनम व मँगनिज अशा सहा सूक्ष्म अन्नघटकांचा संयुक्तपणे समावेश केलेला आहे. आपण वर्षानुवर्षे पिकांची व फळझाड लागवड करत असल्यामुळे जमिनीतील सूक्ष्म अन्नद्रव्यांचे प्रमाणही कमी होत आहे, हे जमीन पृथ:करण अहवालावरून दिसून आलेले आहे. वनस्पतीला आपल्या वाढीसाठी लागणाऱ्या एकूण अन्नद्रव्यांपैकी अल्प प्रमाणात लागणाऱ्या अन्नद्रव्यांना सूक्ष्म अन्नघटकद्रव्ये असे म्हणतात. प्रत्येक अन्नद्रव्याचे विशिष्ट असे कार्य ठरलेले असते. पिकाच्या वाढीमध्ये त्याची जागा अन्य अन्नद्रव्य घेऊ शकत नाही. म्हणून अपेक्षित उत्पादन वाढीच्या दृष्टीने सूक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन खूप महत्वाचे आहे.**

## माइक्रोला मधील अन्नघटक व त्यांची कार्ये

**जस्त (३.००%) :** पिकांतील संजीवके उत्तेजीत होतात व निर्मिती प्रक्रियेस चालना मिळते. त्यामुळे फुलधारणा जास्तीत जास्त प्रमाणात होते.

**लोह (२.५०%) :** हरितद्रव्याचे प्रमाण वाढते. पाने गर्द हिरवीगार होतात. कर्बग्रहणशक्ती वाढून पानातील अन्ननिर्मितीचे कार्य जोमाने होते.

**तांबे (१.००%) :** हरितद्रव्याच्या निर्मितीत उपयोगी पडते व पिकाची उगवणशक्ती वाढविते.

**मँगनिज (१.००%) :** हरितद्रव्याचे प्रमाण वाढते, जैवरासायनिक प्रक्रियेत सहभाग असतो.

**बोरॉन (०.५%) :** फुले व फळे गळण्याचे प्रमाण कमी होते व फळधारणा जास्तीत जास्त प्रमाणात होते.

**मॉलिब्डेनम (०.१%) :** नत्र स्थिरीकरणास मदत होते, प्रथिने उत्पादनात वाढ होते.

## माइक्रोलाची वैशिष्ट्ये

- पिकाची निरोगी, संतुलित वाढ होते व दर्जेदार उत्पादन मिळते.
- नत्र, स्फुरद व पालाश या प्रमुख अन्नघटकांची कार्यक्षमता वाढवते.
- सूक्ष्म अन्नद्रव्यांचा पुरवठा केल्यामुळे मुख्य अन्नद्रव्यांचे वनस्पतीद्वारे शोषण वाढते.
- पिकास संतुलित अन्नद्रव्य पुरवठा होण्यास मदत होते.
- पिकांची रोग प्रतिकारक शक्ती वाढते.
- दाणे, फळे यांचा आकार, वजन व चव वाढते आणि फुलांना आकर्षक रंग येतो.
- फुले व फळे गळत नाहीत.
- फळझाडे, फळभाज्या, फुलझाडे, भाजीपाला, कापूस, द्राक्षे, अन्नधान्य व कडधान्य पिके यांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ होते व प्रत सुधारते.

## वनस्पतीमधील सूक्ष्म अन्नद्रव्य कमतरतेची लक्षणे

**जस्त :** जस्ताच्या कमतरतेमुळे शेंड्यांची वाढ मर्यादित राहिल्याने पर्णगुच्छात रूपांतर होते. पाने लहान, अरुंद व निमुळती होतात. झाडाला फुलोरा कमी प्रमाणात येतो. फळांचा आकार लहान होतो, फळे अपरिपक्व राहतात.

**लोह :** लोहाची कमतरता सर्वप्रथम कोवळ्या पानांवर दिसून येते. पानांच्या शिरांमधील भाग पिवळा पडतो. मात्र शिरा हिरव्या राहतात. पीक नियमित फुलोऱ्यात येत नाही. फळांचा आकार लहान राहतो.

**तांबे :** प्रथम कोवळी पाने गर्द हिरवी पडतात व नंतर फिकट पिवळी होऊन गळून पडतात. पाने देठाजवळ वाकतात. पाने पिवळी होऊन दुमडतात. खोडे वेडीवाकडी होतात. फुले न उमलताच फुलगळ होते. बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढतो.

**मँगनिज :** नवीन पानांच्या शिरा हिरव्या राहतात व शिरांमधील भाग पिवळा पडतो. त्या ठिकाणी करपल्याचे डाग पडतात. पान जाळीदार दिसते. पानावर काळसर व तेलकट डाग दिसतात.

**बोरॉन :** नवीन पालवी वाळून मुख्य शेंडा मरतो. आखूड कांड्याच्या फांद्या फुटतात. पाने पिवळी पडून जाड, खरखरीत व कडक होतात. पानांचा आकार बेढब होतो. खोडावर भेगा पडून ते ठिसूळ होते. परागीभवन व फळ